**महाराष्ट्र शासन**
**शिक्षण संचालनालय (उच्च शिक्षण)**
**महाराष्ट्र राज्य, मध्यवर्ती इमारत, पुणे-४११ ००१.**

web: www.dhepune.gov.in E-mail: scholarshiphd2@gmail.com

फोन नं.०२०/२६१२६९३९ फॅक्स ०२०/२६१११९५३

क्र.उशिसं/शिष्य-२०१७/डीबीटी पोर्टल/11751 7/10/2017

प्रति,

प्राचार्य,
विश्वेश्वरय्या नॅशनल इन्स्टिट्यूट
ऑफ टेक्नॉलॉजी, नागपूर-४४००१०.

**विषयः-** **उच्च शिक्षण संचालनालयाच्या अखत्यारितील शिष्यवृत्ती / आर्थिक सहाय्य योजनांची राज्यशासनाच्या MahaDBT Portal द्वारे अंमलबजावणी करणे बाबत..**
**गुणवान विद्यार्थ्यांना आर्थिक सहाय्य योजना (AMS)**

संदर्भ :- १. शासन निर्णय क्र. एफईडी १०८३/१८१६३५ (२३१७) साशि-५, दि. १७ मे १९८४
२. शासन निर्णय क्र. स्कॉलर-४९१७/प्र.क्र.१४६/मशि-२, दि. ०२/०८/२०१७

सन २०१७-१८ पासून संदर्भिय शासन निर्णयानुसार उच्च शिक्षण संचालनालया मार्फत राबविण्यात येणारी गुणवान विद्यार्थ्यांना आर्थिक सहाय्य या शिष्यवृत्तीस पात्र विद्यार्थ्यांचे नविन मंजूरी / नुतनीकरणाचे अर्ज MahaDBT Portal द्वारे www.mahadbt.gov.in या संकेतस्थळावरुन ऑनलाईन पध्दतीने अर्ज मागविण्यात येत आहेत.

सदर शिष्यवृत्ती योजनेसाठी शासनाने वेळोवेळी निश्चित केलेली कार्यपध्दती, अटी, शर्ती व निकष लागू राहतील. सदर माहिती MahaDBT Portal वर उपलब्ध आहे.

**शिष्यवृत्ती नवीन मंजूरी**

१. संचालनालयामार्फत शिष्यवृत्तीस पात्र विद्यार्थ्यांस माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळाकडून प्राप्त झालेल्या विद्यार्थ्यांच्या घरच्या पत्त्यावर पत्र पाठविण्यात येते. सदर पत्राची छायांकित प्रत अर्जासोबत संकेतस्थळावर अपलोड करणे आवश्यक आहे.
२. अर्जासोबत विद्यार्थ्याने ज्या महाविद्यालयात प्रवेश घेतलेला आहे त्या महाविद्यालयाची चालू वर्षाची फी भरल्याची पावती, वस्तीगृहामध्ये रहात असल्यास वस्तीगृहाचे शुल्क भरल्याची पावती अपलोड करणे आवश्यक आहे.

**शिष्यवृत्तीचे नुतनीकरण**

१. नुतनीकरणाचे ऑनलाईन पध्दतीने अर्ज भरण्यासाठी उच्च शिक्षण संचालनालयाकडून विद्यार्थ्यांना पाठविण्यात आलेल्या प्रथम पत्राची प्रत स्कॅन करुन अर्जासोबत अपलोड करणे आवश्यक आहे.
२. कनिष्ठ महाविद्यालयांतील विद्यार्थ्यांना मागील वर्षात ५५ टक्के गुण प्राप्त करणे आवश्यक आहे.
३. वरिष्ठ महाविद्यालयांतील विद्यार्थ्यांना मागील वर्षात ६५ टक्के गुण प्राप्त करणे आवश्यक आहे.
४. अर्जासोबत चालू वर्षाची फी भरल्याची पावती, हॉस्टेल असल्यास त्याची फी भरल्याची पावती अपलोड करणे आवश्यक आहे.
५. मागील वर्षाची गुणपत्रिकेची प्रत अपलोड करणे आवश्यक आहे.

Nitin pl.
DR (Academic)

सन २०१७-१८ साठी विद्यार्थ्यांनी सदर शिष्यवृत्तीचे अर्ज ऑफलाईन पध्दतीने करु नयेत. तथापि यापूर्वी सन २०१७-१८ साठी ज्या महाविद्यालयांनी / विद्यापीठांनी विद्यार्थ्यांचे ऑफलाईन अर्ज उच्च शिक्षण संचालनालयाकडे सादर केलेले असतील त्या विद्यार्थ्यांनी ऑनलाईन पध्दतीने अर्ज भरणे आवश्यक आहे. तशा सूचना आपण संबंधित विद्यार्थ्यांना देणे आवश्यक आहे. आपल्या महाविद्यालयाचे नांव MahaDBT Portal वर दिसत नसेल तर उच्चशिक्षण संचालनालयाचा दुरध्वनी क्रमांक ०२० २६१२६९३९ अथवा www.scholarshiphd2@gmail.com या इमेलवर संपर्क साधून संचालनालयास MahaDBT Portal वर महाविद्यालयाचे नाव समाविष्ठ करणेसाठी आवश्यक माहिती देण्यात यावी व महाविद्यालयाचा युजर आय. डी. व पासवर्ड प्राप्त करुन घ्यावा.

सदर शिष्यवृत्तीच्या अद्ययावत माहितीसाठी संचालनालयाच्या www.dhepune.gov.in या संकेतस्थळावर वेळोवेळी प्रसिध्द करण्यात येणाऱ्या सूचनांचे वेळोवेळी अवलोकन करावे. विद्यार्थ्यांनी ऑनलाईन भरलेले अर्ज महाविद्यालय / विद्यापीठ यांनी छाननी करुन त्वरीत पुढील टप्प्यावर ऑनलाईन फॉरवर्ड करण्यात यावेत.

विद्यार्थ्यांना अर्ज भरतांना येणाऱ्या तसेच महाविद्यालय / विद्यापीठ यांना अर्जावर पुढील कार्यवाही करताना येणाऱ्या तांत्रिक समस्यासाठी MahaDBT Portal वर देण्यात आलेले टोल फ्री क्रमांक व ई-मेल आय.डी. यावर संपर्क साधावा.

Rbonhade

(अर्चना बोऱ्हाडे)
प्रशासन अधिकारी, शिष्यवृत्ती शाखा
उच्च शिक्षण संचालनालय, महा. राज्य, पुणे - ०१